# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 26 June 2024

Time: 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: २६ जून २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

*ठळक बातम्या*

- **लोकसभा अध्यक्षपदासाठी आज निवडणूक–एनडीएच्या ओम बिर्लांसमोर काँग्रेसच्या के. सुरेश यांचं आव्हान;महाराष्ट्र विधान परिषदेच्या चार जागांसाठीही आज मतदान**
- **नैसर्गिक आपदग्रस्तांना चार दिवसांत नुकसान भरपाई वाटप पूर्ण करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश**
- **छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्तपदी दिलीप गावडे तर पोलिस आयुक्तपदी प्रवीण पवार यांची नियुक्ती**
- **नीट प्रकरणी लातूरच्या दुसऱ्या आरोपी शिक्षकालाही दोन जुलैपर्यंत पोलीस कोठडी**

**आणि**

- **टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचं आव्हान संपुष्टात–उपांत्य फेरीत उद्या भारताचा इंग्लंडशी तर दक्षिण आफ्रिकेचा अफगाणिस्तानशी सामना**

***सविस्तर बातम्या***

लोकसभेच्या अध्यक्षपदासाठी आज निवडणूक होणार आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं या पदासाठी माजी अध्यक्ष ओम बिर्ला यांना पुन्हा संधी दिली आहे. त्यांनी काल उमेदवारी अर्ज भरला. विरोधी पक्षांकडून काँग्रेस खासदार के. सुरेश यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. या निवडणुकीसाठी काँग्रेसने आपल्या पक्षाच्या खासदारांसाठी व्हीप अर्थात पक्षादेश जारी केला आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची लोकसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून निवड करण्यात येणार आहे. काँग्रेसचे महासचिव के सी वेणुगोपाल यांनी काल नवी दिल्लीत ही घोषणा केली.

****

१८ व्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनात नवनिर्वाचित खासदारांना सदस्यत्वाची शपथ देण्याची कार्यवाही पूर्ण झाल्याचं, कार्यवाहक अध्यक्ष भर्तृहरी मेहताब यांनी काल जाहीर केलं. मराठवाड्यातल्या संदिपान भुमरे, बजरंग सोनवणे, नागेश पाटील आष्टीकर यांच्यासह महाराष्ट्रातल्या आणि देशभरातल्या उर्वरित खासदारांनी काल सदस्यत्वाची शपथ घेतली, त्यानंतर सदनाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

दरम्यान, उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी काल संसद भवनात राज्यसभेच्या नवनिर्वाचित सदस्य सुनेत्रा पवार यांना सदस्यत्वाची शपथ दिली.

****

विधान परिषदेच्या मुंबई आणि कोकण पदवीधर तसंच नाशिक आणि मुंबई शिक्षक मतदारसंघांसाठी आज मतदान होत आहे. सकाळी सात वाजेपासून सुरू झालेली मतदान प्रक्रिया संध्याकाळी सहा वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. या मतांची मोजणी एक जुलै रोजी होणार आहे.

दरम्यान, विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या ११ जागांसाठी अर्ज भरण्याला कालपासून सुरुवात झाली. या निवडणुकीसाठी दोन जुलैपर्यंत उमेदवारी अर्ज सादर करता येणार असून, पाच जुलैपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. आवश्यकता भासल्यास, १२ जुलैला मतदान होणार आहे.

****

राज्यातल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकरी तसंच नागरिकांना पुढच्या चार दिवसांत ३० जूनपर्यंत नुकसान भरपाईसाठीची मदतीचं वाटप पूर्ण करण्याचे निर्देश, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. ते काल मुंबईत खरीप हंगाम आढावा बैठकीत बोलत होते. २५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेले तालुके तसंच जिल्ह्यांवर विशेष लक्ष देण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

दरम्यान, राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या १६३व्या बैठकीलाही मुख्यमंत्र्यांनी काल संबोधित केलं. अल्प आणि अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना पीक कर्ज देताना बँकानी

हात आखडता घेऊ नये, अशी सूचना त्यांनी यावेळी केली. पीक कर्ज देताना 'सिबील स्कोअर'ची सक्ती केली जाऊ नये, आणि जिल्हा सहकारी बँका तसंच प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांच्या बळकटीकरणाला प्राधान्य दिलं जावं, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

****

राज्यात विविध विकास प्रकल्पांतल्या प्रकल्पग्रस्तांसाठी उभारण्यात आलेली पुनर्वसित गावठाणं, 'आहे त्या स्थितीत' ग्रामविकास विभागानं तातडीनं ताब्यात घ्यावीत, या पुनर्वसित गावठाणांच्या विकासासाठी आवश्यक अतिरिक्त निधी ग्रामविकास विभागाला देण्यात येईल, अशी घोषणा, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे. ते काल मुंबईत यासंदर्भात झालेल्या बैठकीत बोलत होते.

दरड कोसळून तसंच भूस्खलनामुळे पूर्णपणे गाडल्या गेलेल्या वाड्या, वस्त्या, तांडे, पाडे आणि गावांमधल्या बाधितांनाही प्रकल्पग्रस्तांचा दर्जा देणं तसंच बीड जिल्ह्यात गुणवंती पाटबंधारे प्रकल्पातल्या सुकळी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव, मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्याच्या निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

****

पुणे पोर्शे कार अपघात प्रकरणातल्या अल्पवयीन आरोपीची बालसुधारगृहातून तत्काळ सुटका करण्याचे आदेश, मुंबई उच्च न्यायालयानं दिले आहेत. आरोपीच्या आत्यानं दाखल केलेल्या या याचिकेवर काल झालेल्या सुनावणीत न्यायालयानं हे निर्देश दिले. मात्र, आरोपीचं समुपदेशन सुरू राहील, असंही न्यायालयानं सांगितलं आहे.

दरम्यान, अल्पवयीन आरोपीला जामीन मंजूर झाला असला तरी या प्रकरणातल्या दोषींवर कारवाई होणारच असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. या अपघातात ***मृतांच*** कुटुंबांना काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते १० लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

****

अनुसूचित जाती आणि नवबौद्ध प्रवर्गातल्या सर्व सफाई कर्मचाऱ्यांना लाड – पागे समितीच्या शिफारशी लागू करण्याचा निर्णय, मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला आहे. राज्य शासनाच्या निर्णयानुसार अनुसूचित जाती प्रवर्गातल्या ५९ जातींपैकी केवळ तीन जातीतल्या सफाई कामगारांना वारसांना या समितीच्या शिफारशी लागू होणार होत्या, त्यावर न्यायालयानं हा निर्णय दिला आहे.

****

छत्रपती संभाजीनगर विभागाच्या विभागीय आयुक्तपदी दिलीप गावडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गावडे २००७ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. मधुकर राजे आर्दड यांच्या सेवानिवृत्तीनंतर गावडे यांची या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

दरम्यान, पुण्याचे पोलिस सह आयुक्त प्रवीण पवार यांची छत्रपती संभाजीनगरचे पोलिस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

****

नीट-२०२४ परीक्षा घोटाळ्यातल्या आणखी एका आरोपीला लातूर पोलिसांनी अटक केली आहे. संजय जाधव असं या आरोपी शिक्षकाचं नाव आहे. नीट परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा प्रवेश पत्रं या आरोपीच्या मोबाईलमध्येही आढळून आली आहेत. न्यायालयानं संजय जाधव याला दोन जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

****

टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीच्या लढतींचं चित्र स्पष्ट झालं आहे. उद्या गुरुवारी सकाळी पहिला सामना दक्षिण अफ्रिका आणि अफगाणिस्तान या संघात तर याच दिवशी रात्री दुसरा सामना भारत आणि इंग्लंड संघात होणार आहे.

दरम्यान, काल सकाळी झालेल्या अटीतटीच्या सामन्यात अफगाणिस्ताननं बांगलादेशला डकवर्थ लुईस नियमाच्या आधारे पराभूत केलं. अफगाणिस्तानच्या या विजयामुळे ऑस्ट्रेलियाचं या स्पर्धेतलं आव्हान संपुष्टात आलं आहे.

****

जालना जिल्हा क्रीडा संकुलावर सध्या सुरु असलेली विविध क्रीडा प्रकारांच्या पायाभूत सुविधांची कामं जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश, पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले आहेत. ते काल जिल्हाधिकारी कार्यालयात यासंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

****

बुलडाणा जिल्ह्यातल्या सिंदखेडराजा इथं शिव मंदिराच्या उत्खननात सापडलेली, शेषशायी विष्णूची मूर्ती सिंदखेडराजा इथंच राहणार असल्याचं, भारतीय पुरातत्व विभागाचे संचालक अरुण मलिक यांनी स्पष्ट केलं आहे. राजे लखोजीराव जाधव

यांच्या समाधी स्थळाच्या परिसरातच ही मूर्ती सुव्यवस्थितपणे ठेवण्यात येईल, असं त्यांनी सांगितलं.

✻✻✻✻

ज्येष्ठ रंगकर्मी आणि निरुपणकार दिगंबर गोसावी यांचं काल पुण्यात निधन झालं, ते ८८ वर्षांचे होते. छत्रपती संभाजीनगर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागातून निवृत्त झाल्यावर त्यांनी आध्यात्मिक निरुपणाला प्रारंभ केला होता. त्यांच्या पार्थिव देहावर काल पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले.

✻✻✻✻

नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी दर महिन्याच्या २५ तारखेला, जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांमध्ये स्वच्छता मोहीम राबवण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. काल या मोहिमेचा मुख्यालयातून शुभारंभ करण्यात आला.

✻✻✻✻

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची दीडशेवी जयंती आज साजरी होत आहे. या दिनाच्या औचित्यानं राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष येत्या एक जुलैपर्यंत छत्रपती शाहू महाराजांचा जन्मोत्सव साजरा करणार आहे.

दरम्यान, नांदेड शहरातही आज समता दिंडीचं आयोजन करण्यात आलं आहे. सकाळी आठ वाजता शहरातल्या महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करुन समता दिंडीची सुरवात होणार आहे.

✻✻✻✻

हिंगोली इथल्या अनुसया विद्या मंदिरामध्ये जिल्हा महिला आणि बाल विकास कार्यालयामार्फत बाल कायद्यांबाबत काल जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं.

✻✻✻✻

राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि लातूर या चार जिल्ह्यातल्या चौदा वसतिगृहांमध्ये इयत्ता अकरावीपासून पुढच्या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना नि:शुल्क प्रवेश दिला जातो, पात्र विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा,

असं आवाहन छत्रपती संभाजीनगर इथल्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकाऱ्यांनी केलं आहे.

****

लातूर जिल्ह्यातल्या ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींच्या वसतीगृहांची प्रवेश प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, अशा सूचना लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या आहेत. समाज कल्याण विभागाच्या आढावा बैठकीत त्या काल बोलत होत्या.

****

मध्य रेल्वेच्या पुणे विभागात दौंड ते मनमाड दरम्यान सुरू असलेल्या रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाच्या कामामुळे काही रेल्वे गाड्यांच्या मार्गात तात्पुरता बदल करण्यात आला आहे तर काही गाड्या अंशतः रद्द करण्यात आल्या आहेत. प्रवाशांनी याची नोंद घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****